आश्रमशाळा, अंगणवाडी, कुरणशाळा, साखरशाळा, भोंगा शाळा सर्वांना परिचित आहेत, पण पाण्यावरची तरंगती शाळा पाहायची असेल तर गोव्याला जायला हवे. गोव्यातील पेडणे तालुक्यातील केरी गावातील 'किरणपाणी' हा भाग तेरेखोल खाडीच्या किनाऱ्यावर आहे. तिच्या पलीकडच्या तटालाही किरणपाणी म्हणतात. हा भाग महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोंदा गावात येतो. आरोंद्याहून फेरीबोटीने पलीकडे गोव्यात गेल्यावर उजव्या हाताला वळून पाचसहा मिनिटे चाललात की तुम्हाला तेरेखोल खाडीच्या किनाऱ्यावर रेतीचा उपसा करणाऱ्या कामगारांची वस्ती व खाडीतील होड्यांतून रेतीचा उपसा करणारे कामगार दिसतील. तेथेच तुम्हाला किनाऱ्याजवळ 'मुव्हिंग स्कूल' असा कानडी, इंग्रजी व मराठीत लिहिलेला नामफलक असलेली खाडीच्या पाण्यावर तरंगणारी शाळा दिसेल.

खरे तर ती शाळा नसून शिकवणी वर्ग आहे. हा तरंगणारा शिकवणी वर्ग चालविणारी संस्था (Moving School Organization) अशासकीय, अधार्मिक व कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेली नोंदणीकृत संस्था आहे. हा फिरत्या शाळेचा प्रकल्प म्हणजे डेन्मार्कमधील अँडर्सन लिनेट या उद्योजकाचे स्वप्न आहे. अँडर्सन लिनेट गेली १३ वर्षे भारतात येत आहेत. भारताला ते दुसरी मातृभूमी मानतात. भारतासाठी काहीतरी करावे ही त्यांची आत्यंतिक इच्छा. फिरत्या शाळेचे त्यांचे हे स्वप्न साकार केले आहे मनीषा कुळकर्णी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी. मनीषा कुळकर्णी या प्रकल्प समन्वयक असून त्यांनी पर्यावरण शास्त्र आणि व्यवस्थापन यातील पदव्युत्तर पदवी घेतली आहे.

गोव्यात विविध क्षेत्रात काम करण्यासाठी कामगार येतात. त्यातील तेरेखोल खाडीतून रेतीचा उपसा करणाऱ्या, कर्नाटकातून आलेल्या कामगारांच्या मुलांच्याच शिक्षणाचा प्रश्न या संस्थेने हाताळण्याचे ठरविले. हे कर्नाटकातून आलेले कामगार तेरेखोल खाडीच्या किनाऱ्यावरील झोपड्यांतून किंवा जवळपासच्या गावात राहतात. त्यांच्याबरोबर त्यांची मुलेही येतात. ही मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, त्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळावे म्हणून हा फिरत्या शिकवणी वर्गाचा प्रकल्प सुरू केला. फिरत्या शिकवणी वर्गाचा प्रकल्प का, तर एका ठिकाणची वाळू काढून झाली की त्यांना पुढे दुसरीकडे जावे लागते.

सुरुवातीला संस्थेने १२ ऑगस्ट २००४ रोजी देवसू (कोरगाव- पेडणे तालुका) येथे शिकवणी वर्ग सुरू केला. आता देवसू येथे दोन वर्ग व अरपोरा (कळंगुट) येथे एक वर्ग असा विस्तार झाला आहे. सुरुवातीला वर्गाची वेळ सकाळी ८.३० ते १२.३० अशी होती. परंतु मुले घरी आल्यावर पाण्यात खेळतात, कपडे खराब करतात, अभ्यास करीत नाहीत, तसेच काम करताना मुलांकडे लक्ष देणे शक्य नसते. पाण्याजवळ वस्ती असल्याने लहान मुलांच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते म्हणून मुलांच्या पालकांनी दुपारीही वर्ग भरवण्याची विनंती केली. त्यामुळे आता दुपारी १.३० ते ४.३० पर्यंत वर्ग चालतात.

सर्वसाधारणपणे पाच वर्षांवरील मुलांना प्रवेश दिला जातो. एकाच वर्गात पहिली ते चौथीपर्यंतची मुले बसतात. मुलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून या वर्गात २५ पेक्षा अधिक मुले घ्यायची नाहीत, असे संस्थेने ठरविले आहे. मुलांना भाषा, अंकगणित, नीतिशिक्षण व सामान्य ज्ञान हे विषय शिकवले जातात. त्यांना वह्या, पुस्तके, गणवेष, छत्र्या, बूट वगैरे वस्तू संस्थाच विनामूल्य देते.

या वर्गात बटणे, सुईदोरा व नेलकटरही ठेवलेले आहेत. बटण तुटले तर ते कसे लावायचे, फाटलेला शर्ट कसा शिवायचा हे मोठ्या मुलांना गुरुजी शिकवतात. लहान मुलांच्या कपड्यांची बटणे लावणे, फाटलेले कपडे शिवणे, नखे काढणे ही कामे गुरुजीच करतात. क्वचित कधीतरी एखाद्या मुलाचे कपडे मळलेले असले तर ते धुऊन देण्यासाठी वर्गातच साबणही ठेवलेला आहे. सकाळी वर्ग भरण्यापूर्वी व सुटल्यानंतर मोठ्या मुलांच्या सहकार्याने गुरुजी वर्ग झाडतात. यातूनच मुले नीटनेटकेपणा शिकतात.

काही मुलांचे पालक पावसाळ्यात पेरणीसाठी आपल्या गावी जातात. त्या वेळी त्यांच्याबरोबर गेलेली मुले तेथील शाळांत जातात व गणपतीनंतर परत येतात. तेथील शाळांमधून त्यांची नावे नोंदविली आहेत की नाही हे पाहण्याचे काम संस्था करते. या शिकवणी वर्गातून पहिली ते चौथीपर्यंतचा अभ्यासक्रम जातो, कारण पाचवीपासून मुले आई-वडिलांना सोडून स्वतंत्रपणे राहू शकतात. गावाकडील नातेवाईकांकडे राहून पुढील शिक्षण घेऊ शकतात. परंतु काही मुलांची आई-वडिलांना सोडून राहण्याची मानसिक तयारी नसते. अशी बहुधा पाचवी ते आठवीपर्यंतची काही मुले आपल्या आई-वडिलांबरोबर परत येतात. येताना आपल्या वह्या, पुस्तके आणतात. वर्ग दोन वेळ भरत असल्यामुळे शिक्षक या मोठ्या मुलांनाही शिकवू शकतात.

संस्था या मुलांच्या आरोग्याकडेही लक्ष देते. वर्षातून दोनदा मुलांची वैद्यकीय तपासणी केली जाते. ज्या मुलांना खरूज झालेली असते, त्यांना मलम व औषधेही देतात. वर्षातून एकदा सर्व मुलांना जंताचे औषध दिले जाते. त्याशिवाय इतर आजारांवरही उपचार केले जातात.

या कामगारांमध्ये बालविवाहाची प्रथा आहे. एका मुलीचे लहानपणी लग्न झाले होते. तिच्या पालकांची समजूत घालून गुरुजींनी तिला सासरघरी पाठवू दिले नाही. सज्ञान होईपर्यंत ती मुलगी शिकवणी वर्गात येत होती. सध्या तिच्या सासरची माणसेही खूष आहेत; कारण पूर्वी दुकानदार फसवणूक करायचे, पण या मुलीला पैशांचा हिशेब समजत असल्यामुळे फसवणूक होत नाही- हे आता त्यांच्या लक्षात आले आहे. पालकांचे मतपरिवर्तन करण्याचे कार्य संस्था करीत आहे.

संस्थेचे काम पाहून बरेच लोक मदत करतात. देवसू गावातील एका सन्माननीय, सुविद्य आणि श्रीमंत व्यक्तीने आपल्या घरातील दोन खोल्या विनामूल्य दिल्या आहेत. शाळेची रंगरंगोटी दरवर्षी तेच करतात. तसेच शाळेचे विजेचे बिलही तेच भरतात, केवळ नाव जाहीर न करण्याच्या अटीवर. हरमलहून तीन भावंडे आपल्या धाकट्या भावाला घेऊन बसने

किरणपाणी येथील वर्गात येतात. विशेष म्हणजे, या मुलांचे पैसे संस्थेने बसच्या मालकाला देऊ केले, पण तेही पैसे घेत नाहीत. ॲडव्होकेट आंबेकर हे एका शिक्षकाचा दर महिन्याचा पगार देतात. एक चार्टर्ड अकौंटंट विनावेतन संस्थेचा हिशेब पाहतात. अँडर्सनच्या पत्नी स्वत: वास्तुविशारद आहेत. त्या मुलांना गणवेश देतात. 'अपोलो ग्रुप' ही ट्रॅव्हल एजन्सी दहा दिवसांतून एकदा पर्यटकांना शाळा दाखवायला घेऊन येते. त्या वेळी आवर्जून पर्यटकांमार्फत ५०० रु. देणगी एजन्सीच्या प्रतिनिधी देतात. DANIDA (Danish Industrial Development Authority) या संस्थेनेही मदत करण्याची तयारी दर्शविली आहे.

डेन्मार्कमध्ये Social Education विषयातील पदवीचा अभ्यास करणाऱ्या सिग्ने जस्पर्राम नावाच्या डॅनिश शिक्षिका त्यांच्या प्रकल्पासाठी सहा महिन्यांच्या मुदतीवर गोव्यात आल्या होत्या. जुलैमध्ये त्या परत गेल्या. देवसू येथील शाळेच्या मुलांना त्या विनावेतन इंग्रजी शिकवत होत्या.

याशिकवणीवर्गांचा विस्तार आता वाढत चालला आहे. तेरेखोलच्या किनाऱ्यावर जिथे जिथे रेती उपसण्याचे काम चालते, तिथे तिथे संस्थेने शिकवणी वर्ग सुरू केले आहेत व पुढेही काढावे लागतील. परंतु पुष्कळदा शाळेसाठी जागा मिळवताना अनेक अडचणी येतात हे जाणून कुणीतरी तरंगत्या वर्गाची कल्पना सुचविली. नाहीतरी ही मुले किनाऱ्यापासून आठ-दहा फुटांवर राहतात. त्यांना पाण्याची कसली भीती ? खाडीत किनाऱ्यालगत पाण्यात बॅरलवर हा वर्ग बांधला आहे. या तरंगत्या वर्गात फळा, टेबल व डेस्कची सोय आहे. वर्गात जाण्यासाठी पाण्यावर तरंगणारा छोटासा बांबूचा पूल बांधला आहे. पुढे त्यांना चांगला नावाडी मिळाला तर सकाळी किरणपाणी व दुपारी दुसरीकडे तो वर्ग नेऊन शिकवणी वर्ग चालवण्याचा विचार आहे. ही तरंगती शाळा पाहणारा प्रत्येकजण 'आवडली ही मज मनापासूनी शाळा' असे म्हटल्याशिवाय राहणार नाही.

**शीला बक्षी**